दिनांक: २१-जुलै-२००५.

प्रिय सर,


पत्र लिहितोय पण कारण काहीच नाही. वाटलं लिहावं. हो, पण निमित्त आहे! निमित्त आहे गुरुपौर्णिमेचं. प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातील महत्त्वाच्या सणाचं. तसं तर प्रत्येक जण आयुष्यभर विद्यार्थीच असतो, परंतु असतं कुणी, ज्यांच्यामुळे आपल्याला विद्यार्थीपण येतं. असतं कुणी, ज्यांच्यामुळे वाहत जातो आपण या प्रवाहात.

आज गुरुपौर्णिमा! गुरु-शिष्यांचा सोहळा! पण सर, आज माझ्याकडे काहीच नाही. फक्त कृतज्ञतेचा भाव आहे. जवळपास वर्षभराचा काळ लोटला. या काळात जो काही प्रवाह तुमच्यापासून माझ्यापर्यंत वाहिला, हे पत्र म्हणजे फक्त त्याची पोचपावती आहे. हे आभारप्रदर्शन नाही, पण आभाराचे दोन शब्द आहेत. हे लिहिलं जरी शाईने असलं, तरी त्यात भावनेचा अर्क आहे.

खरं तर सर, मी तुमच्याकडून फार काही technical नाही शिकलो; आणि जर मी शिकलोच असतो, तर कदाचित ह्या पत्रासाठी मी गुरुपौर्णिमेच्याऐवजी शिक्षकदिनाचा विचार केला असता, नाही का? हो, तुमच्याकडून technical knowledge मिळालं, परंतु त्यापेक्षा अधिक जर काही शिकायला मिळालं, तर "शिकवण्याची दुर्दम्य इच्छा / आवड" आणि "विषयाला समर्पित होण्याची वृत्ती".

शिकवण्याचं वेड तर आधीपासूनच आहे, पण तुमच्याकडून कळालं की, आपल्या वेडात विद्यार्थ्यांनाही कसं सामील करावं; आपला ऊत्साह त्यांच्यामध्ये कसा वाटावा. दुसरी गोष्ट म्हणजे समर्पण, हार्डवर्क! ते मात्र शिकतोय. मनात आस-आग खूप आहे, पण म्हणावी तशी पेटत नाही. विषयाचं वेड लागतं, पण वेळ पुरत नाही. आधीच दिवसाला फक्त चोवीसच तास असतात, परंतु त्यातही वेळ वाया जातोय असं वाटतंय. प्रयत्न करतोय, पण dedication कमी पडतंय.

मी तुम्हाला देत काहीच नाही, काही देऊ शकतही नाही;
परंतु मागतोयच तुमच्याकडून, अगदी हक्कानं.
सर गरज आहे, नितांत गरज आहे, तुमच्या आशीर्वादांची .




आपला

निलेश